| अ.क्र. | संशोधन पत्रिकेचा विषय | लेखकाचे नाव | पान क्रं. |
|---|---|---|---|
| ५२. | स्त्रीवादी प्रतिबिंबित : रीटा वेलिणकर | मच्छगंधाली नितीन तारळेकर | २७१ |
| ५३. | स्त्रीवादी साहित्याच्या अग्रणी : विभावरी शिरुरकर | संचिन माधवराव कोतकर[1] स्वयंपूर्णा विजय गायकवाड[2] | २७४ |
| ५४. | आनंदीबाई शिर्के यांच्या साहित्यातील स्त्रीवाद | सुषमा रामचंद्र जाधव | २७८ |
| ५५. | अर्वाचीन मराठी नियतकालिकातील स्त्री-चित्रण | डॉ. चंदना अनिल लोखंडे | २८२ |
| ५६. | | पाटील मॅडम | २८६ |
| ५७. | कवयत्री शांताबाई शेळके यांच्या कवितेतील स्त्रीवादी जाणिवा | सुरेखा विठ्ठल देशमुख | २९० |
| ५८. | गंगाधर गाडगीळांच्या कथेतील स्त्रीचित्रण : स्त्रीवादी दृष्टिकोण | सुनिता बा. मोटे (जाधव) | २९४ |
| ५९. | मराठी ग्रामीण कादंबरीतील स्त्रीवादी चित्रण ऊसतोडणी कामगार स्त्रियांच्या अनुषंगाने | डॉ. वैशाली किरण औताडे | ३०१ |
| ६०. | स्त्री गीतातून घडणारे स्त्री भावनांचे दर्शन | शोभा हणमंतराव मिसाळ | ३०७ |
| ६१. | आसाराम लोमटे यांच्या कथांमधील स्त्री चित्रण | लता बिरु ऐवळे | ३१२ |
| ६२. | स्त्रियांची रंगभूमी आणि भूमिका | प्रमोद नेताजी पाटील | ३१८ |
| ६३. | 'धग' या ग्रामीण कादंबरीतून उमटलेले स्त्री चित्रण | कल्पना दत्तात्रय शिंगाडे | ३२३ |
| ६४. | समाज, स्त्रीवाद आणि स्त्रीवादी साहित्य | शुभम कल्लाप्पा गौराजे | ३२८ |
| ६५. | मराठीतील स्त्रीवादी साहित्य | अश्विनी मारुती लोहार | ३३५ |





Scanned with OKEN Scanner

Radhabai Kale Mahila Mahavidyalaya Ahmednagar-414001

# स्त्रीवादी साहित्याच्या अग्रणी : विभावरी शिरुरकर

सचिन माधवराव कोतकर[1], स्वयंपूर्णा विजय गायकवाड[2]
[1]सहायक प्राध्यापक, [2]विद्यार्थिनी, राधाबाई काळे महिला महाविद्यालय, अहमदनगर

प्रास्ताविक :

सामाजिक बंधनाच्या कुंपनात बंदिस्त असलेल्या समस्त स्त्री वर्गाची कुचंबना साहित्यातून परखडपणे मांडली असेल तर ती म्हणजे विभावरी शिरुरकर यांनी होय. एकाबाजूला कल्पनात्मक, रंजनात्मक, राजकीय साहित्याचे अनुकरण मराठी साहित्यात होत असताना दुसरीकडे प्रौढ कुमारिकांसंबंधीच्या सुशिक्षित स्त्रियांविषयींच्या, सामाजिक प्रश्नाला साहित्यातून वाचा फोडण्याचे काम विभावरी शिरुरकर म्हणजेच मालतीबाई बेडेकर यांनी केले. १९३३ ते १९४५ या काळात मराठी साहित्याला हादरे देण्याचे काम विभावरी शिरुरकर यांनी केले. 'कळ्यांचे निःश्वास' या कथा संग्रहाने स्त्रियांच्या कथा साहित्यात परिवर्तनाला सुरुवात केली.त्यानंतर आलेल्या त्यांच्या 'हिंदोळ्यावर' या कादंबरीने विभावरी शिरुरकरही व्यक्ती नेमकी कोण आहे. यासंबंधी मोठे कुतुहल मराठी विश्वात निर्माण झाले.जवळपास १३ वर्षे त्यांच्या नावाचे कोडे उलगडले गेले नव्हते.एका व्याख्यानात ज्यावेळी त्यांनी स्वतःच त्यासंबंधीचा खुलासा केला. तेंव्हा कुठे लोकांना समजले की,विभावरी शिरुरकर म्हणजे मालतीबाई बेडेकर आहेत. बऱ्याच जनांना असे वाटत होते की,विभावरी शिरुरकरया स्त्रिच्या नावाने कोणी पुरुषच लिखान करीत आहे. कारण विभावरी शिरुरकरया नावाने जे लेखन केल गेले होते, त्यातून पारंपरिक वाङ्मयीन अभिरुचीला मोठे धक्के दिले गेले होते. त्यासंबंधीची चर्चा तत्कालीन नियतकालिकांतून देखील झालेली होती.या घटनेची दखल तत्कालीन लेखक, वाचक यांनी देखील घेतली होती. यावरुन विभावरी शिरुरकरांचे लेखन किती स्फोटक स्वरुपाचे असेल याची प्रचीती येते. विभावरी शिरुरकरांच्या कादंबरी लेखना संदर्भात उषाताई शिंदे यांनी 'विभावरी शिरुरकर यांचे वाङ्मयः स्त्रीवादी आकलन' या पुस्तकात पुढील मत व्यक्त केले आहे "शिक्षणाबरोबर आर्थिक स्वावलंबनाची जोड मिळाली तर स्त्रीला आत्मसन्मान प्राप्त होईल का? या प्रश्नाचे उत्तर शोधण्याचा प्रयत्न त्यांच्या कादंबरी वाङ्मयात दिसतो."[१] उषाताई शिंदे यांच्या वरील मता वरुन लक्षात येते की, विभावरी शिरुरकरांना सामाजिक प्रप्रश्नांची झालेली जाणीव त्यांना साहित्याच्या माध्यमातून कशा पध्दतीने मांडलेली होती.

नितीमूल्यांची शिकवण :

विभावरी शिरुरकरांची एकंदरीतच व्यक्तिमत्वाची जडण घडण जर पाहिली तर स्त्रियांच्या गुलामगीरीचे,त्यांच्या घुसमटीचे अत्यंत वास्तवदर्शी चित्रण त्यांच्या साहित्यात कशा पध्दतीने उमटले असावे याची कल्पना येते. विभावरी शिरुरकरांनी आपल्या लेखनीतून जे तत्कालीन स्त्रीयांचे प्रश्न निर्भिडपणाने मांडले; त्यामागे त्यांच्यावर नितीमूल्यांची शिकवण त्यांच्या कुटुंबात झालेली दिसून येते. विभावरी षिरुरकर यांचा जन्म रायगड जिल्ह्यातील आवास या गावी झाला. त्यांचे वडील अनंत खरे हे षिक्षक होते. विभावरी शिरुरकरयांचे पूर्वाश्रमीचे नाव बाळूताई खरे हे होते. त्यांच्या वडिलांना समाजातील जातीभेद मान्य नव्हता.त्यासंबंधीचे विचार ते कुटुंबात बोलून दाखवत असत.खरे मास्तर हे पुरोगामी विचारसरणीचे असल्याने त्यांच्या सुधारणावादी विचारांचे संस्कार त्यांच्या दोन्ही मुली



Scanned with OKEN Scanner